<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. २९/२०१३</u>

निशाण क्र. ५६ लगत.

<u>पुढील उलटतपास वादी यांचा प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री.एल.एल. नाथगोसावी यांचेमार्फत शपथेवर सुरु—</u>

४२. मी तुकाराम धाकू पाटील या व्यक्तीस ओळखत नाही. ही व्यक्ती मला कधी भेटली असे घडले नाही. ही व्यक्ती माझ्या इतर भावंडांना कधी भेटली का याची मला माहीती नाही. या व्यक्तीने मला नोटीस पाठविली व मला बोलावून घेतले असे घडले नाही. मी या व्यक्तीस दाव्याबाबत माहीती दिली असे घडले नाही. प्रतिवादी क्र. ८ ही मतीमंद अगर वेडी आहे असा ठराव मी सक्षम न्यायालय अगर प्राधीकरण यांच्याकडून करुन घेतला नाही. प्रतिवादी क्र. ८ हिला टी.डी.पाटील भेटले होते का याची मला माहीती नाही. मी प्रतिवादी क्र. ८ शी टी.डी.पाटील यांना भेट घालून देण्याचा प्रयत्न केला नाही. टी.डी.पाटील यांनी मला प्रतिवादी क्र. ८ ला घेवून त्यांच्याकडे येण्यास सांगीतले नव्हते. टी.डी.पाटील यांना मी दाव्याबाबतचे कागदपत्र पुरवले नव्हते. प्रतिवादी क्र. ८ ही मतीमंद आहे, वेडी आहे असे कागदपत्र मी टी.डी.पाटील यांना दिले नव्हते.

४३. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील त्यांच्या आर्थिक व्यवहाराचे कागदपत्र त्यांच्याकडेच ठेवायचे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी त्यांची आर्थिक व्यवहाराची कागदपत्रे त्यांच्या पश्चात प्रतिवादी क्र. १ कडे दिली. हे म्हणणे खरे आहे की, आंबाडयाची वहाळी विरवाडी या मिळकतीचे खरेदीपत्र माझ्या वडीलांकडेच होते. हे म्हणणे खरे नाही की, या मिळकतीमध्ये सुरुवातीला बांधलेला घरइमला अनिलच्या नावे नोंद केला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी राहत असलेला वाडा गावामध्ये खाली असलेला घरइमला सुरुवातीला माझ्या आईच्या नावे नोंद होता. हे म्हणणे खरे नाही की, हा इमला बांधण्यापूर्वी बिनशेती आदेश माझ्या आईच्या नावे घेतला गेला. माझ्या वडीलांनी वाडा गावामध्ये खाली असलेला माड बागेमधील घरइमला, वीरवाडी येथील घरइमला, आम्हा सर्व भावंडांचा मिळून बांधलेला वाडा येथील घरइमला आमच्या वडीलांनी स्वउत्पन्नातून बांधला असे साक्षीदार मानेने होकारार्थी उत्तर देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या

वडीलांनी वाडा गावामध्ये खाली असलेला माड बागेमधील घरइमला, वीरवाडी येथील घरइमला, आम्हा सर्व भावंडांचा मिळून बांधलेला वाडा येथील घरइमला आमच्या वडीलांनी स्वउत्पन्नातून बांधला. हे म्हणणे खरे आहे की, वाडा गावातील माड बागेतील घरइमला सोडून दुसरा घरइमला माझ्या वडीलांनी स्वउत्पन्नातून बांधला आहे. उलटतपासातील माझ्या म्हणण्यानुसार माझ्या वडीलांची शुध्द दि. १५/१०/२०११ इ. रोजी सकाळी ८.०० ते ९.०० वाजण्याच्या मानाने हरपली होती, त्यांची शुध्द ते मरेपर्यंत हरपली होती. टी.डी.पाटील यांच्या नेमणुकीची कॉस्ट मी भरली नाही. टी.डी.पाटील यांच्या नेमणुकीच्या अनुषंगाने मी त्यांच्याकडे कधीही खर्चाचे विवरण मागीतले नव्हते. या नेमणुकीच्या अनुषंगाने मी नाझरकडे खर्चाचे विवरण मागीतले नाही. प्रतिवादी क्र. ८ हिच्या वतीने नाझर म्हणून टी.डी.पाटील यांची नेमणुक झाली होती याची मला माहीती नाही. प्रतिवादी क्र. ८ हिच्या वतीने इष्टमित्र म्हणून नाझर टी.डी.पाटील यांची नेमणुक झाली होती याची मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई लग्न होवून सासरी आल्यानंतर ती मयत होईपर्यंत तिला उत्पन्नाचे साधन नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आंबाडयाची वहाळी विरवाडी येथील बाग माझ्या वडीलांनी स्वखर्चाने विकसित केली. माझ्या आईवर माझ्या वडीलांचा विश्वास होता. माझी आई माझ्या वडीलांशी निष्ठावंत होती. माझी आई सचोटीची व इमानदार अशी होती. माझी आई माझ्या वडीलांना त्यांच्या व तिच्या हयातीमध्ये कधीही फसवू शकणार नाही अशी होती. माझ्या वडीलांनी आंबाडयाची वहाळी विरवाडी येथील बागेच्या उत्पन्नातून वादातीत फ्लॅट विकत घेतला असे माझे म्हणणे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांना त्यांच्या निवृत्तीनंतर सेवानिवृत्ती वेतन होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.८ हिचे हितरक्षण प्रतिवादी क्र.४ याने कधीही केले नाही.

प्रश्न—तुम्ही मागील उलटतपासामध्ये विरवाडी येथील जमीन रावजी यांनी खरेदी केली असे उत्तर दिले आहे त्या अनुषंगाने तुम्ही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही ?

(प्रतिवादीतर्फे उलटतपासामध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नावरुन साक्षीदाराने दिलेल्या उत्तराबाबत कागदोपत्री पुरावा दाखल करण्यासंदर्भात प्रश्न विचारता येणार नाही अशी हरकत वादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी घेतली. या उलट प्रतिवादीतर्फे विद्वान

विधीज्ञांनी भारतीय पुरावा अधिनियम कलम १३८ नुसार त्यांना असे प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे असे सांगीतले. दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रस्तुत साक्षीदारास मागील उलटतपासामध्ये विचारलेल्या प्रश्नास अनुसरुन त्याने विरवाडी येथील जमीन रावजी यांनी खरेदी केली असे उत्तर दिले आहे. भारतीय पुरावा अधिनियम कलम १३८ मधील तरतुदीनुसार उलटतपास हा साक्षीदाराने सरतपासामध्ये दिलेल्या वस्तुस्थितीबाबतच मर्यादीत नसतो असे दिसून येते. त्यामुळे प्रस्तुतचा प्रश्न हा अनावश्यक आहे असे मला वाटत नाही. सबब हरकत फेटाळण्यात येते.)

उत्तर—असा पुरावा मी दाखल केला नाही.

असा पुरावा माझ्याकडे उपलब्ध आहे का हे मला निश्चित सांगता येणार नाही. हा दावा दाखल करण्यापूर्वी मी आमच्या सर्व मिळकतींच्या कागदपत्रांची पडताळणी केली नव्हती.

प्रश्न—तुमची आई हयात असताना त्या एखादा उदयोग करीत होती असा कागदोपत्री पुरावा तुम्हाला दाखल करता येईल का ?

(सदर साक्षीदार हा अर्धांगवायुने आजारी आहे, त्याला त्रास देण्यासाठी उलटतपास लांबवला जात आहे, आतापर्यंत पृष्ठ क्रमांक १९ ते पृष्ठ क्रमांक ३४ पर्यंत प्रस्तुत विधीज्ञ या साक्षीदाराचा उलटतपास घेत आहेत, त्यांनी साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची ही चौथी तारीख आहे, त्यामुळे अशा उलटतपासास वादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी हरकत घेतली आहे. प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी साक्षीदार अर्धांगवायुने आजारी आहे म्हणून ते त्यांचे प्रश्न विचारण्याचे टाळू शकत नाहीत, ते उलटतपास घेवून साक्षीदाराला त्रास देत नाहीत असे सांगीतले. दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकण्यात आला. संपुर्ण उलटतपासाचे अवलोकन केले असता प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी यापूर्वी या साक्षीदाराचा घेतलेला उलटतपास पृष्ठ क्रमांक १९ ते ३४ पर्यंत झाला आहे, तसेच या साक्षीदाराचा उलटतपासाकरिता आजची ही चौथी तारीख आहे असे दिसून येते. प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञांना किंबहुना कोणत्याही पक्षकाराच्या विधीज्ञांना त्यांच्या पक्षकाराच्या हिताकरिता आवश्यक

व योग्य प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे, मात्र त्याचबरोबर साक्षीदाराची शारीरिक क्षमता व एका साक्षीदाराचा उलटतपास किती प्रमाणात व किती तारखांना घ्यावा हे देखील लक्षात ठेवले पाहीजे याची नोंद विधीज्ञांनी घ्यावी. प्रतिवादी क्र.१ ने कैफियतीमध्ये दावा मिळकत कै. सहदेव यांनी त्यांच्या स्वउत्पन्नातून त्यांनी खरेदी केली आहे असे स्पष्टपणे कथन केले आहे, त्यामुळे त्यांच्या पत्नीचा उदयोग होता किंवा नाही या संदर्भात विचारलेला प्रश्न आवश्यक आहे असे मला वाटते. सबब विद्वान विधीज्ञांनी वरील बाबीची नोंद घ्यावी. तसेच वरील कारणास्तव सदर हरकत फेटाळण्यात येते. )

उत्तर—नाही.

हे म्हणणे खरे आहे की, माझी आई कायमस्वरुपी गृहीणी होती. माझ्या आईच्या हयातीत तिला उत्पन्नाचे साधन होते असा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, आंबाडयाची वहाळी विरवाडी येथील बागेतील उत्पन्न माझे वडील इतर लोकांशी करार करुन स्वतः घेत होते. हे म्हणणे खरे आहे की, वडीलांच्या मृत्यूपश्चात मी व प्रतिवादी या बागेचे उत्पन्न घ्यायला सुरु केले. माझ्या वडीलोपार्जीत मिळकतींचे सातबारा उतारे मी पाहीले नाहीत. आमच्या गावातील वडीलोपार्जीत मिळकतीपैकी कोणत्या जमीनीत किती कलमे आहेत हे मला निश्चित सांगता येणार नाही. वडीलोपार्जीत मिळकतीमधुन उत्पन्न कधी सुरु झाले हे मला निश्चित सांगता येणार नाही. वडीलोपार्जीत मिळकती विकसित करायला किती खर्च आला याचा हिशोब मला सांगता येणार नाही. तो हिशोब माझ्याकडे नाही. वडीलोपार्जीत मिळकतीतून किती उत्पन्न मिळायचे याचा हिशोब माझ्याकडे नाही. वडीलोपार्जीत मिळकतीतील उत्पन्नाचा किती भाग कुटूंबासाठी खर्च व्हायचा याचा हिशोब माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, वडीलोपार्जीत मिळकतीमधील कलमांचे आज रोजीचे वय ४० वर्षाचे आहे. सहदेव हयात असताना वडीलोपार्जीत मिळकतीतून उत्पन्न घेण्यासाठी सहदेव यांना किती खर्च यायचा याचा हिशोब माझ्याकडे नाही. कलमांपासुन उत्पन्न मिळवण्यासाठी त्यासाठी खर्च करणे आवश्यक असते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ व्यतिरिक्त इतर प्रतिवादी मला सामील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी व प्रतिवादी क्र. २ ते ७ एकमेकांशी बोलतो, आमचे एकमेकांशी चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी व

प्रतिवादी क्र. २ ते ७ एकत्र संगनमत करुन मी हा दावा दाखल केला आहे. मी प्रतिवादी क्र. २ ते ७ यांना वडीलोपार्जीत मिळकतीतून किती उत्पन्न येते, खर्च किती होतो हे मी विचारले होते. त्याचा हिशोब मी न्यायालयात देवू शकत नाही. माझ्याकडे वडीलोपार्जीत मिळकतींचे आजपर्यंतचे हिशोब उपलब्ध नाहीत असे म्हटले तर बरोबर होणार नाही. असा हिशोब मी न्यायालयात देवू शकत नाही. विरवाडी येथील जागा वडीलोपार्जीत आहे या माझ्या म्हणण्याच्या पृष्ठयर्थ माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही.  माझ्या वडीलांवर गैरवाजवी दबाव आणला, त्यांची फसवणूक केली याबाबत मी व प्रतिवादी क्र.२ ते ७ यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी राजीखुषीने, पूर्ण जाणीवेने फ्लॅटचे मृत्यूपत्र प्रतिवादी क्र.१ चे नावे करुन दिले आहे. आंबाडयाची वहाळ विरवाडी या बागेमध्ये कोंबडयाची पोल्ट्री सुरु केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर पोल्ट्री प्रतिवादी क्र. १ चे नावे सुरु केली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यासाठी लागणारा खर्च माझ्या वडीलांनी केला होता. साक्षीदारास खरेदीपत्र दाखवण्यात आले. सदरचे खरेदीपत्र आंबाडयाची वहाळ विरवाडी या बागेच्या जमीनीचे आहे.

प्रश्न— सदर खरेदीपत्रामधील मजकूर बरोबर आहे का ?

उत्तर—खरेदीपत्रामधील अक्षर समजत नाही.

या खरेदीपत्रामध्ये आशालता सहदेव परब ही खरेदी घेणार आहे. हे म्हणणे खरे आहे की, या खरेदीपत्रामध्ये खरेदी देणार म्हणून शंकर केसरकर, रत्नाजी केसरकर, विष्णू केसरकर, सिताबाई केसरकर, आत्माराम केसरकर, सखाराम केसरकर, तुकाराम केसरकर, राजाराम केसरकर यांची नावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखत रु.५००/— ला करण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीपत्र आंबाडयाची ओळ, व्हाळी या मिळकतीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, स.क्र. २२अ हि.क्र.२, स.क्र.२३ हि.क्र.२, स.क्र.२४ हि.क्र.२ या मिळकती माझ्या आईच्या नावे खरेदी झाल्या. या खरेदीखताचा मोबदला रुपये पाचशे वर नमूद केसरकर वगैरे यांना पोच केला. हे म्हणणे खरे आहे की, या खरेदीखतामध्ये खरेदी देणार

म्हणून सर्व केसरकरांच्या सहया आहेत. (सदर खरेदीखतामध्ये सर्वच केसरकरांच्या सहया नाहीत, आंगठयाचे ठसे आहेत अशी हरकत वादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी नोंदवली.) हे म्हणणे खरे आहे की, या खरेदीखतामध्ये काही केसरकरांच्या सहया आहेत व काही केसरकर यांच्या आंगठयाचे ठसे आहेत. आंबाडयाची वहाळ विरवाडी ही जमीन माझ्या वडीलांनी आईच्या नावे गहाण ठेवली असेल. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांनी ही मिळकत बॅक ऑफ इंडिया, शाखा वाडा या बॅकेकडे गहाण ठेवली. सदर गहाणकर्ज माझ्या वडीलांनी फेडले. साक्षीदारास बिनशेती आदेश दाखविण्यात आला.

प्रश्न—सदर बिनशेती आदेश माडबागेतील घरइमल्या व्यतिरिक्त वाडा येथील घरइमल्या संदर्भात तुमच्या आईच्या नावचा आहे?

उत्तर—त्यातील मजकूर मला दिसत नाही.

(साक्षीदाराने सदर आदेशातील मजकूर त्याच्याकडे असलेला चष्मा घालुन पाहीला, तरी देखील तो मजकूर त्याला दिसत नाही असे तो सांगत आहे. )

सदर बिनशेती आदेश वाचण्यासाठी मी माझ्या वतीने मुखत्यार नेमणार आहे. मी दोन दिवसात मुखत्यार नेमणार आहे. (साक्षीदाराच्या उलटतपासा दरम्यान त्याला वाचता येत नसलेला कागद वाचण्यासाठी त्यांनी मुखत्यार नेमण्याबाबत कायदयामध्ये तरतुद नाही, केवळ दिशाभूल करण्यासाठी हे प्रश्न विचारण्यात आले आहेत अशी हरकत वादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी घेतली आहे.)

सदर बिनशेती आदेश मला वाचता येईल असा चष्मा मी नेत्रतज्ञांकडे जावून बदलून घेणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाडा गावामधील माडबागायत मधील इमला सोडून दुसरा इमला सर्वे क्रमांक ५२७ अ हि.क्र.१,२,३,४ या मिळकतीमध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, आंबाडयाची वहाळ ही मिळकत माझ्या वडीलांनी आईच्या नावे खरेदी घेताना सदर मिळकत विकसित करुन त्यातुन उत्पन्न घ्यायचे हा उद्देश खरेदीचा होता. हे म्हणणे खरे नाही की, डॉ. हेमंत जोशी यांनी माझ्या वडीलांवर कोणतेही उपचार केले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील दावा फ्लॅट प्रतिवादी क्र.१ च्या नावे मृत्यूपत्राने करणार याची माहीती आम्हा इतर भावंडांना होती. माझे वडील पोलीस खात्यात नोकरीला असल्याने एखादी मिळकत त्यांनी खरेदी केल्यास त्याचा अहवाल त्यांच्या वरिष्ठांना दयावा लागत असेल याची

नियमित दिवाणी मुकदमा क्र. २९/२०१३

निशाण क्र. ५६ लगत.

माहीती मला नाही.

न्यायालयाची मध्यंतराची वेळ झालेने पुढील उलटतपास मध्यंतरापर्यंत तहकूब केला.

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक—१५/११/२०१८.

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवगड.

मध्यंतरानंतर वादी यांचा पुढील उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे सुरु—

४४. पुरसीस म्हणजे काय याचा अर्थ मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मगाशी कोणत्या कागदावर सही केली, तो कागद काय आहे, त्या कागदाविषयी, त्या कागदामध्ये काय मजकूर होता हे मला माहीती नाही. त्या कागदामध्ये तुम्ही दाखवलेला कागद वाचण्यासाठी दुसरा माणूस हवा होता त्याची काय गरज नाही असा मजकूर होता. पहील्या सत्रामध्ये उलटतपासा दरम्यान बिनशेती आदेशामधील मजकूर वाचण्यासाठी मी मुखत्यार नेमणार असे सांगीतले होते. न्यायालयामध्ये खरे बोलायचे असते याची मला कल्पना आहे. सदर मजकूर वाचण्यासाठी मी मुखत्यार नेमणार हे मी दिलेले उत्तर खरे होते.

४५. हे म्हणणे खरे नाही की, वडीलांना मृत्यूसमयी मधुमेह, रक्तदाब यासारखे विकार जडले होते, मृत्यूपुर्वी काही दिवस माझे वडील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल होते, मानसिक दृष्टया ते त्यावेळी सदृढ नव्हते, मृत्यूपूर्वी कित्येक दिवस ते सतत आजारी होते हे मी खोटे नमूद केले आहे. मी आज रोजी दिलेल्या पुरसीसमधील मजकूर खरा आहे. सदर पुरसीस मी स्वत: लिहीली नाही. अशी पुरसीस दयायची असे मी वकीलांना सांगीतले नव्हते. ( सकाळच्या सत्रामध्ये वादीतर्फे मुखत्यार नेमण्यात येणार असेल तर पुढील तारखेला उलटतपास घेण्यात येईल असे प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी सांगीतले होते, त्यामुळे सदर पुरसीस

न्यायालयासमक्ष वादीचे सहीने देण्यात आली आहे ही बाब रेकॉर्डवर येण्यासाठी वादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी विनंती केली आहे. त्यामुळे सदरची बाब रेकॉर्ड करण्यात आली आहे. ) हे म्हणणे खरे नाही की, आमच्या वडीलांनी दावा फ्लॅट त्यांच्या स्वत: करिता खरेदी केला होता. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या वडीलांनी माझ्याकडे किंवा अनिलकडे वडीलोपार्जीत मिळकतीबाबत मुखत्यारपत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आंबाडयाची वहाळी विरवाडी ही मिळकत खरेदी केली त्यावेळी माझे वडील पोलीस खात्यात नोकरीला होते. आंबाडयाची वहाळी विरवाडी ही मिळकत माझ्या वडीलांनी त्यांच्या स्वउत्पन्नातून आमच्या आईच्या नावे खरेदी घेतली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमची वडीलोपार्जीत कलमे किती आहेत, उत्पन्न किती मिळते हे दाव्यात नमूद करायला मला अडचण नव्हती. मला जी काही अडचण होती ती अडचण मी दाव्यात नमूद केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील कुटूंबकर्ते असल्याने वडीलोपार्जीत मिळकतीच्या उत्पन्नातून दावा फ्लॅटचा व्यवहार ठरवला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांना वैद्यकिय उपचाराची सतत गरज होती त्यामुळे त्यांनी देवगडात राहणे पसंत केले हे मी खोटे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आमच्या सर्व मिळकतींची जबाबदारी त्यांनी माझ्यावर व अनिलवर सोपवली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत आमच्या कुटूंबाची सामाईक मिळकत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या सर्वांच्या समंत्तीने दावा मिळकतीचा व्यवहार ठरवण्यात आला हे मी खोटे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, हा व्यवहार पूर्ण करण्याची जबाबदारी प्रतिवादी क्र.१ कडे देण्यात आली हे मी खोटे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी प्रतिवादी क्र.१ ला लिहून दिलेले मृत्यूपत्र योग्य व बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांची कोणतीही फसवणूक झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मृत्यूपत्रावरील सही व अंगठा माझ्या वडीलांचा नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी त्यांना कोणतेही शारिरीक व मानसिक द्रौबल्य नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, वडीलांनी पूर्ण जाणीवेने मृत्यूपत्र करुन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर मृत्यूपत्रामधील प्रतिवादी क्र.८ बद्दलचा मजकूर नमूद आहे. हे म्हणणे खरे नाही की, मृत्यूपत्राच्या वेळी वडीलांवर कोणताही अनुचित प्रभाव नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, दावा

नियमित दिवाणी मुकदमा क्र. २९/२०१३

निशाण क्र. ५६ लगत.

मिळकत फ्लॅट माझ्या वडीलांची स्वसंपादीत एकटयाची मिळकत होती. रावजी कधी मयत झाले याची मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील प्रतिवादी क्र.८ ला घेवून प्रतिवादी क्र.१ सोबत त्यांच्यावरील प्रेमापोटी राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, सहदेव मयत झाल्यानंतर प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.८ ला घराबाहेर काढले व वाडा येथे आणून सोडले हे मी खोटे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज देखील प्रतिवादी क्र.१ हाच प्रतिवादी क्र.८ चे औषधपाणी, कपडालत्ता, पालनपोषण वगैरे तजवीज करतो. हे म्हणणे खरे नाही की, विवेक नलावडे हे माझ्या वडीलांचे मित्र होते.

प्रश्न—तुमच्या वडीलांची देखभाल प्रतिवादी क्र.१ हाच करायचा ?

उत्तर—प्रतिवादी क्र.१ कडे वडील असताना तो त्यांची देखभाल करायचा व. वडील वाडा येथे असताना त्यांची देखभाल आम्ही करायचो.

४६. हे म्हणणे खरे नाही की, वडील वाडा येथे असताना त्यांची देखभाल आम्ही करायचो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दाव्यातील व सरतपासातील प्रतिवादी क्र.१ च्या हिताविरुध्दचा सर्व मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मृत्यूपत्रावरील साक्षीदाराने सहया अपरोक्ष केल्या असाव्यात हे मी खोटे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील प्रतिवादी क्र.१ व त्याच्या कुटूंबावर अवलंबून असल्याने ते त्यांच्या दबावाखाली राहत असत हे म्हणणे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यात मागीतलेली कोणतीही दाद मिळण्याजोगी नाही.

उलट तपास प्रतिवादी क्र.१ तर्फे पुर्ण.

प्रतिवादी क्र.२ व ५ करिता उलटतपासकामी पुढील तारीखपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/—

दि. १५/११/२०१८ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर देवगड